# ‘पुरुष’ नाटकातील सामाजिक व राजकीय वास्तव

**प्रा. गौतम बाब्या गमरे**
Mob. No. - ८८९८२१६७५५)
Email Id -
gamaregautam.gg.gg@gmail.com
डॉ. टी. के. टोपे कला आणि वाणिज्य रात्र
महाविद्यालय, परेल, मुंबई- १२

---

‘पुरुष’ हे जयवंत दळवी यांचे नाटक असून हे नाटक मार्च १९८३ मध्ये प्रकाशित झाले. ह्या नाटकाचा पहिला प्रयोग ‘कलावैभव’ मुंबई या संस्थेतर्फे १९८२ रोजी शिवाजी मंदिर , मुंबई येथे सादर करण्यात आला. ह्या नाटकाचे दिग्दर्शन विजय मेहता यांनी केले होते .

प्रस्तुत नाटक दोन अंकी असून नाटकात अंबिका हे प्रमुख पात्र आहे शिवाय आण्णासाहेब ( अंबिकाचे वडील), ताराबाई (अंबिकाची आई), मथुरा (अंबिकाची मैत्रीण), सिद्धार्थ (अंबिकाचा प्रियकर), गुलाबराव ( राजकीय नेता), पांडू (गुलाबरावाचा नोकर), ही आणखी काही महत्त्वाची रंगमंचावरील पात्रे आहेत. त्याचप्रमाणे बंडा, (एक क्रांतिकारक), बाबुराव (मथुराचा नवरा), खंडेराव पाटील (राजकीय नेता), माया गवई (बलात्कार पीडित दलित तरुणी), इ. रंगमंचाबाहेरील पात्रे आहेत.

‘पुरुष’ हे एक सामाजिक नाटक असून त्याची भाववृत्ती शोकात्म आहे. ह्या नाटकातील वास्तवातून सामाजिक अंगाने शोकात्मभाव व्यक्त झालेला आहे.

अहंकारी पुरुषी वृत्तीने स्त्रियांचा केलेला मानसिक , शारीरिक छळ, स्त्रीला उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याचा पुरुषी दृष्टिकोण, त्यातून स्त्रियांवर होणारे बलात्कारासारखे प्रकार आणि बलात्कार होऊनही त्यांना न्याय न मिळणे, अन्यायाला बळी पडलेली अंबिका, स्वतःवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात तिने आक्रमक भूमिका घेणे. आदी घटना नाटकात अभिनीत होतात.

प्रस्तुत नाटकात दळवींनी सामाजिक गंभीर विषयास स्पर्श केला आहे. आधुनिक युगात स्त्री सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली आहे हे जरी खरे असले पुरुषाची तिच्याकडे पाहाण्याची वृत्ती बदललेली नाही. ह्याकडे नाटककार अनेक घटनांमधून वाचकप्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतो. स्त्रीला स्वतःचे भान आलेले असल्याने हे स्त्रीमुक्ती आंदोलने होत आहेत. स्त्री-पुरुष समतेचा दावा केला जातो, स्त्रिया विविध क्षेत्रात स्वतःला सिद्ध करीत आहेत. तरीही पुरुषवर्ग जगभर प्रस्तापित सत्ता शक्तीच्या जोरावर स्त्रीला नमवू पाहतो. त्यासाठी तो शरीरबलाचा वापर करू पाहातो. ह्या प्रकारच्या सामाजिकतेशी ‘पुरुष’मधील काही घटना साधर्म्याचे नाते सांगताना दिसतात. उदाहरणार्थ. अंबिका गुलाबरावच्या बंगल्यावर शाळेसाठी देणगी घेण्याकरिता जाते तेव्हा तो कपटाने तिच्यावर बलात्कार करतो.

प्रस्तुत नाटकाची सुरुवात आकाशवाणी वरील बातम्यांनी होते . त्यातील एक बातमी स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची आहे. त्यावर पंतप्रधान स्त्रियांनी सामर्थ्यवान बनणे खूप महत्त्वाचे आहे असे सांगतात. तर दुसरी बातमी अकोला येथे एक मोठा जमीनदार व राजकीय पुढारी असणारा खंडेराव पाटील याच्यावर पाच अज्ञात इसमांनी हल्ला करून त्याचे डोळे फोडले आणि त्याचे दोन्ही हात कापून टाकले अशा प्रकारची आहे. खंडेराव पाटील

ह्यावर हा हल्ला एक दलित मुलीवर ( माया गवळी) बलात्कार करून त्यातून निर्दोष सुटण्याच्या घटनेमुळे होतो असा संदर्भ येतो. ह्या घटना प्रत्यक्ष रंगमंचावर घडलेल्या नाहीत तरी त्या एकूण नाट्यार्थासाठी महत्त्वाच्या ठरतात. ह्या दुस-या घटनेची पुनरावृत्ती प्रत्यक्ष रंगमंचावर अंबिकेच्या बाबतीत घडताना दिसते.

अंबिकेवर झालेला बलात्कार हा देखील एका राजकारणी व्यक्तीने ( गुलाबरावने) केला आहे आणि तो सुद्धा राजकीय आर्थिकसत्तेच्या जोरावर निर्दोष सुटतो. रंगमंचाबाहेरील व रंगमचावरील ह्या घटनांच्या माध्यमांतून भारतीयसमाज व्यवस्थेत 'स्त्री' राजसत्तेत कशी असुरक्षित आहे हे उघड केले जाते. त्याचवेळेला नाटककार प्रस्थापित समाज जातव्यस्थेच्या बाहेर कसा येऊ शकत नाही. तो पीडित स्त्रीला एक पीडित स्त्री म्हणून पाहत नाही तर स्त्रीबाबात घडलेल्या अन्याविरूध्द दाद मागताना लोकसमूहांना पीडित स्त्रीची जात महत्त्वाची वाटते.म्हणून दलित असलेल्या उमा गवईला न्याय मिळावा म्हणून केवळ दलित संघटना एकत्र येतात तर ब्राह्मण अंबिकेवर बलात्कार होतो तेव्हा केवळ उच्चवर्णीय संघटना एकत्र येतात. एकंदरित पीडित स्त्रीच्या बाजूला माणुसकीच्या नात्याने जात धर्माच्या पलीकडे जाऊन सर्वांनी संघटित होणे संयुक्तिक ठरेल असा विचार जातव्यवस्थेच्या प्रभावाखाली असलेल्या कोणालाही वाटत नाही, हे सर्वाधिक वैषम्यपूर्ण आहे.

नाटककार ह्या प्रकारचा प्रसंग कल्पून 'स्त्री' तिच्यावर होणारा अन्याय हा समान मुद्दा न मानता भारतीय समाज त्या अन्यायाकडे जातधिष्ठित तसेच धर्माधिष्ठित दृष्टीतून कसे पाहतो हे वाचकप्रेक्षकास दाखवू पाहातो. स्वाभाविकपणे जात, धर्म ह्या व्यवस्थांनी समाजाला स्त्रीबाबत कसे संवेदनशून्य बनविले आहे, हेच मुखरित करू पाहातो. म्हणूनच सिध्दार्थसारखे पात्र नाटकात महत्त्वाचे ठरते.

प्रस्तुत नाटकातील अंबिकेचे वडील आणि सिद्धार्थ ह्या पात्रांमधील संवादही ह्याच प्रकारचे वास्तव उघड करतात. बलात्कारीत माझ्या गवळीसाठी केला जाणाऱ्या आंदोलनात. सहभागी होण्यासाठी जाताना बलात्कारीत अंबिकेकडे पैसे घेण्याकरिता येतो. असा नाट्य क्षण कल्पून नाटककार समाजस्थित विपरीत वास्तवाकडे वाचकप्रेक्षकाचे लक्ष वेधून घेतो. तसेच ह्या नाट्यक्षणी नाटककाराने सिद्धार्थ आणि अंबिकेचे वडील ह्या पात्रांना समोरासमोर आणून जो नाट्यक्षण कल्पिलेला आहे त्या क्षणी त्या दोघांमध्ये घडलेला संवाद आदर्श ते विपरितता असा जो भारतीय समाजाचा प्रवास आहे तो सहजपणे वाचक प्रेक्षकांसमोर ठेवला जातो.

उदाहरणार्थ,

सिध्दार्थ : सकाळी नामदेवचा निरोप आला...अकोल्याला
ये. मोर्चा काढायचाय. माया गवई प्रकरण
पेटवायचंय....

अण्णा : (चिडून) पेटवा ! खरं म्हणजे त्या माया गवईशी
तुमच्यांतल्या एखाद्या तरुणानं आधी लग्न
करायला पाहिजे. आदर्श घालून दिला पाहिजे !
खानदेशातील एका कुरूप मुलीचं लग्न होत
नव्हतं, तर आमचे साने गू्रुजी तिच्याशी लग्न
करायला निघाले होते.

सिध्दार्थ : (खिजवण्यासाठी) जो तो दुस-यानं काय केले, ते
सांगतो....



Research Hub International Journal

अण्णा : (चिडून) अरे, तुला काय माहीत आहे?
ही....ही......तारा....(आत हात दाखवीत)
नवऱ्यानं टाकलेली.....! माहेरनं पैसे आणीत नाही,
म्हणून....मी आपणहून गेलो आणि तिला मागणी
घालून लग्न केलं....! नुसतं पुढारीपणा करीत
बसलो नसतो !( पृष्ठे ३४-३५)

सदर संवादात उपरोक्त मुद्द्याबरोबर आणखी एक मुद्दा येतो तो म्हणजे 'अण्णा' हे पात्रही या व्यवस्थेच्या मूल्यप्रभावातून मुक्त झालेले नाही. त्यामुळे ते परित्यक्ता स्त्रीशी आपण लग्न केले ह्याचा उल्लेख वारंवार करतात. असा उल्लेख करताना आपण ताराबाईंवर खूप उपकार केले आहेत आणि त्या उपकाराच्या ओझ्याखाली तिने जगावे अशी सूचनाच ते प्रत्यक्षा अप्रत्यक्षपणे देत राहातात, असे म्हणता येते.

ताराबाई हे पात्र रूढी, परंपरा ह्यांचे ओझे स्वीकारून जगते. अण्णांनी आपल्याला एका अर्थाने जीवदान दिले अशी त्यांच्याविषयी आदराची भावना तिच्या मनात असते. व्यवस्थाशरणता हाच तिचा स्थायीभाव आहे म्हणूनच आपल्या मुलीवर अन्याय झाला असला तरी तिने अन्याविरूध्द लढण्याचे तिला भय वाटते परिणामी ती मुलीला राहते घर सोडून दुसऱ्या शहरात जाण्याचा मार्ग सुचविते. इतकेच नाही तर मुलीवर झालेला शारीरिक मानसिक अत्याचार सहन न होऊन स्वतः विष घेऊन आत्महत्या करते. घडल्याप्रसंगी समाजात झालेली बदनामी आणि राजकीय दबाव ह्या गोष्टीच तिच्या आत्महत्येस कारणीभूत ठरतात.नाटकातून व्यक्त होणारे हे सामाजिक वास्तव नाटकात शोकात्म भाव व्यक्त करते.

सिद्धार्थ हे पात्र समाजसेवक, क्रांतिकारक म्हणून सामोरा येतो. दलित समाजावर होणाऱ्या अन्याया विरोधात आवाज उठवणारा, आधुनिक विचारसरणीचा दलित सुशिक्षित तरुण आहे. त्याच्याही मुक्तिलढ्याला जातिव्यवस्थेचे कुंपण आहे. हे पात्र स्त्रीचे चारित्र्य ह्या संकेताकडे पारंपरिक विचारसरणीतूनच पाहते. म्हणूनच अंबिकेवर बलात्कार झाला आहे हे समजल्यानंतर तो तिच्याशी लग्न करण्यास नकार देतो. उमा गवई ह्या दलित मुलीवर अत्याचार झाल्यानंतर सिद्धार्थ तिला न्याय मिळवून देण्यासाठी होणाऱ्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी जातो पण आपल्या प्रेयसीवर झालेल्या अन्यायाविरोधात कृतिशील होण्याची गरज त्याला वाटत नाही. पुरुष मग तो कोणत्याही जातीतील असो तो पुरुषसत्ताक व्यवस्थेला विरोध करीत नाही. बलात्कारसारख्या कृतीत पुरुष शिक्षेस पात्र व्हायला हवा असे मानण्याऐवजी तो स्त्रीच्या चारित्र्याची चिंता करतो. ही विसंगतीही नाटककार ह्या पात्राच्या उक्तिकृतीद्वारे उघड करतो.

प्रस्तुत नाटकात गुलाबराव हे पात्र राजकारणी, सत्ताधारी पक्षात सहभागी असणारे आणि पुरुषी अहंकाराने विकृत झालेले दिसते. ह्या पात्राचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोण पुरुषकेंद्री व्यवस्थेशी निगडित आहे. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे ,तिने तिच्यावर होणारा अत्याचार सहन करावा. ह्या त्याच्या विचारामुळेच चित्रेबाई, चारूलता सप्रे आणि अंबिका ह्यांसारख्या स्त्रियांची आयुष्य उद्ध्वस्त होतात. अंबिकेवरील बलात्कार प्रकरणातून तो सत्तेच्या आणि पैशाच्या जोरावर निर्दोष सुटतो. नाट्यगत वास्तवात गुलाबराव हे पात्र पुरुषी अहंकारी मानसिकतेचे व सामाजिक - राजकीय वास्तव विकृतीचे चिन्ह ठरते.

नाटककार जयवंत दळवी राजकारणी पुरुषपात्राठायी विशिष्ट प्रकारच्या वृत्तिप्रवृत्ती कल्पून राजकारणी स्त्रीकडे एक उपभोग्य वस्तू म्हणून कसे पाहतात हे उघड करू पाहातात. प्रस्तुत पात्राच्या पार्श्वभूमीवरून आपण

आपल्या सभोवतालचे सामाजिक-राजकीय वास्तव पाहिले तर ते नाट्यगत वास्तवाशी साधर्म्याचे नाते सांगत असल्याचे म्हणता येते.

अंबिका ही या नाटकातील महत्त्वाचे म्हणजे मध्यवर्ती पात्र आहे. हे पात्र पेशाने शिक्षक आहे . अंबिका आपल्या कोणत्याही भूमिकेवर ठाम राहणारी सामाजिक चळवळीत सक्रिय असलेली, सामजिक भान असलेली एक उदयोन्मुख कर्तबगार स्त्री आहे. म्हणूनच बलात्कारानंतर व्यवस्थेला शरण न जाता न्यायासाठी शेवटपर्यंत झगडत राहाते. मात्र प्रस्थापित व्यवस्थेत अखेरीस तिच्या पदरी निराशाच येते.पुरुषधार्जिण्या व्यवस्थेत तिला न्याय जरी मिळाला नसला तरी ती स्वतःच्या पद्धतीने आपल्यावरील अत्याचाराचा बदला एक स्त्री म्हणून घेते. आणि समाजासमोर एक नवा अध्याय ठेवते.

नाटककाराने सिध्दार्थ, अण्णा, गुलाबराव ह्या पात्रांच्या चित्रणातून तसेच त्यांच्या संवादातून भारतीय समाजातील जात व पुरुषसत्ताक व्यवस्था एकमेकांना कशा पूरक आहेत आणि या दोन्ही व्यवस्थेमध्ये स्त्री कशी भरडली जाते हे वाचकप्रेक्षकांच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्याचबरोबर काही विशिष्ट प्रसंगात नाटककारने गांधी टोपीचा अन्वर्थक वापर करून गांधीवीदी विचारसरणीला राजकीय सत्ताधिशांनी कसे हास्यास्पद ठरविले आहे हे उघड केले आहे.

उदाहरणार्थ,

बलात्कारप्रसंगी अंबिकाने ओरडू नये म्हणून त्याचे साथीदार तिच्या तोंडात गांधी टोपी कोंबतात. महात्मा गांधीजींनी आपले सर्व आयुष्य देशाच्या स्वातंत्र्याकरिता खर्ची घातले. सार्वजनिक,वैयक्तिक जीवनात सत्याचा आग्रह धरला.गांधी टोपी ही एका विचारसरणीचे प्रतीक म्हणून अस्तित्वात आली. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात एका पक्षाने ही टोपी त्या विचारसरणीचे प्रतीक म्हणूनच स्वीकारली.पण कालांतराने ही विचारसरणी मागे पडत चालली. ती धारण करणाऱ्यांचे वैचारिक, नैतिक अध:पतन झाले हेच नाटकार दाखवून देऊ पाहतो.

प्रस्तुत नाटकात अंबिका आपल्यावर झालेल्या बलात्काराची तक्रार पोलिसस्टेशनला देते परंतु तिला तिथेही पोलीस मदत करीत नाहीत. लोकशाहीचा चौथा खांब असलेली समाजमाध्यमे आपला स्वार्थ साधून तिच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगतात. अशा प्रकारच्या संवेदनाशून्य माध्यामांचे वास्तव दर्शन नाटकात घडते. यानंतर आपण नाट्यगत वास्तवातील काही संदर्भ उलगडून पाहू.

‘पुरुष’ या नाटकात समाजव्यवस्था, न्यायव्यवस्था यांच्याविषयी काही प्रसंगात भाष्य येताना दिसते. प्रस्थापित व्यवस्थेच्या मुळाशी पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेची तत्त्वप्रणाली असल्यामुळे ह्या व्यवस्था बलात्कारित स्त्रीकडे किती निष्ठूरपणे पाहातात हे अधोरेखित केले आहे.

अंबिका बलात्कारानंतर पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविण्यासाठी जाते तेव्हा तिची तक्रार नोंदवून घेतली जात नाही. न्यायालयात तिलाच आपल्यावर बलात्कार झाल्याचे सिद्ध करावे लागते. विशेष म्हणजे कुटुंबापासून सर्व स्तरांवर बलात्कारित स्त्रीकडे तुच्छताभावाने पाहिले जाते.

उदाहरणार्थ,

“बलात्कार झाला. तिच्यातच काही तरी गोम असणार,वाईट चालीची असणार !आमच्यावर नाही करत तो बलात्कार कोणी !” (पृ. ४८ ) (अंबिकाचा संवाद) ह्या सारखे मत घडल्याप्रसंगी व्यक्त करतात. आणि तिची त्यात कोणतीही चूक नासताना देखील तिलाच गुन्हेगाराच्या पिंजऱ्यात उभे करतात.

इतकेच नाही तर अंबिकाच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या पालकांचे मत देखील अशाच प्रकारचे असते.

Research Hub International Journal

उदाहरणार्थ,

"झाला प्रकार वाईट झाला ,पण कोर्ट कचेऱ्या कसल्या करतात ह्या बाई?. मुलींच्या मनावर वाईट परिणाम होतो. मुलंमुली एकत्र बसणार कशी अशा शिक्षिकेच्या वर्गात?"(पृ. क्र.४८) (अंबिका) असे विचार करणारा समाज तिचे मानसिक खच्चीकरण करून तिचे जगणे असह्य करताना दिसतो.

अंबिका आपल्या अन्यायाविरोधात खंबीरपणे उभी राहते. गृहमंत्र्यांना भेटते,मोर्चे काढते,परंतु तिला न्याय मिळत नाही. या आघाताने ताराबाई आत्महत्या करते तरीही खचून न जाता या पुरुषी समाजव्यवस्थेला तोंड देऊन आपला लढा पुढे चालू ठेवते. परंतु या भ्रष्ट व्यवस्थेपुढे हतबल होते आणि आक्रमक होऊन हिंसेचा मार्ग स्वीकारते. बंडा ह्या समाज-क्रांतिकारकाच्या मदतीने ह्या अत्याचाराविरुद्ध व अन्यायाचा सूड म्हणून गुलाबरावाचे पुरुषी लिंगच कापून टाकते आणि एकप्रकारे आज पुरुषीवृत्तीला व अहंकाराला ती एक आव्हान देऊन ही वृत्ती बदलावण्याचे संकेतच देताना दिसते व त्यातून स्वरक्षणाचा एक पर्याय समाजातील इतर स्त्रियांपुढे ठेवताना दिसते.

नाटककार ह्या प्रकारची घटिते वाचकप्रेक्षकांसमोर ठेवून व्यवस्थेचा दंभस्फोट तर करतोच पण त्याचबरोबर वाचकप्रेक्षकास चिंतन-मननास उद्युक्त करतो. नाटककाराने बंडासारखे आदर्श पात्र कल्पिने आणि बलात्कारीत स्त्रीने गुन्हेगार पुरुषाचे लिंग कापणे हे अ-वास्तव असले, ते एक दिवस स्वप्न असले तरी पीडित स्त्रीच्या मनात व संवेदनशील पुरुषाच्या मनात ह्या प्रकारचा विचार येण्याची शक्यता गृहीत धरलेली दिसते. विशेषतः पीडित स्त्रीला न्यायासाठी नैतिक बळ न देणाऱ्या व्यवस्थेच्या व पुरुषी विशिष्ट मानसिकतेच्या पार्श्वभूमीवर ही शक्यता वाचक प्रेक्षकाच्या मनातही समाज बदलण्याची गरज आणि शक्यताही निर्माण करू शकते. 'बंडा' ह्या पात्राची निर्मिती ह्या अर्थाने लक्षणीय ठरते. मूलतः सामाजिक प्रकृतीचे असलेले हे नाटक 'बंडा'ह्या पात्राच्या निर्मितीमुळे नाट्यगत आशयास अधिक प्रभावीपणे सामाजिक, नैतिक मूल्ये तर प्रधान करतेच आणि त्याचे सौंदर्यैत्तर मूल्यसंदर्भ अधिक ठळक करते असे म्हणता येईल.

**संदर्भग्रंथ :**

- दळवी, जयवंत ( १९८३ ) 'पुरूष', मॅजेस्टिक बुक स्टॉल, (प. आ)

Research Hub International Journal